**प्रेसनोट** **दिनांक २४/०८/२०२२**

**आरोपी लोकसेवक १) सुरेश सुधाकर फासे, वय ४५ वर्षे व्यवसाय नोकरी पद ग्रामसेवक, ग्रामपंचायत पारे ता सांगोला २) श्रावण बाजीराव घाडगे, वय ५६ वर्षे व्यवसाय नोकरी पद विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय सांगोला जि. सोलापूर यांच्यावर रु ३०००/- ची लाच मागणी करुन तडजोडीअंती रु २५००/- लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कमेमध्ये आरोपी क्र.०१ यांनी स्वत:करीता १५००/- रु व आरोपी क्र.०२ यांनी सांगितलेप्रमाणे १०००/- रु असे एकुण २५००/- रु यातील आरोपी क्र.०१ यांनी स्विकारलेवरुन सापळा कारवाई करण्यात आली आहे.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | सांगोला पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| **आरोपीचे नांव व कार्यालय** | १) सुरेश सुधाकर फासे, वय ४५ वर्षे व्यवसाय नोकरी पद ग्रामसेवक, ग्रामपंचायत पारे ता सांगोला<br>२) श्रावण बाजीराव घाडगे, वय ५६ वर्षे व्यवसाय नोकरी पद विस्तार अधिकारी, पंचायत समिती कार्यालय सांगोला जि. सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | सादर केलेल्या बिलास अनुसरुन बिलाचे ०२ टक्केनुसार रु ३०००/- |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | आरोपी क्र.०१ यांनी स्वतःकरीता १५००/- रु व आरोपी क्र.०२ यांचेकरीता १०००/- रु असे एकुण २५००/- रु |
| **थोडक्यात माहिती** | पडताळणी दि २३/०८/२०२२ व दि २४/०८/२०२२<br>सापळा दि २४/०८/२०२२<br>यातील तक्रारदार हे मौजे पारे ग्रामपंचायतीचे सदस्य असुन पारे गावातील गोरडवस्ती येथे पाईपलाईनचे काम १५ वा वित्त आयोग सन २०२०-२०२१ अंतर्गत मंजुर झाले असुन सदरचे काम हे पारे ग्रामपंचायतीस मिळाले होते. त्याअनुषंगाने सदर कामाची सर्व जबाबदारी पार पाडण्याकरीता पारे येथील सरपंच यांनी लेखी आदेशान्वये यातील तक्रारदार यांची नियुक्ती केंली आहे. त्यानुसार वर नमुद काम पुर्ण झाल्यानंतर सदर कामाचे बिल मंजुर होवुन मिळणेकरीता तक्रारदार यांनी पाठपुरावा केला असता यातील ग्रामसेवक फासे यांनी सदर बिलावर सही करुन पंचायत समिती सांगोला येथील विस्तार अधिकारी घाडगे यांचेकडे सादर करण्याकरीता स्वतः करीता १ टक्का प्रमाणे १५००/- रु व पंचायत समिती येथुन बिल मंजुर होण्याकरीता विस्तार अधिकारी घाडगे यांचेकरीता १ टक्का प्रमाणे १५००/- रु असे एकुण ३०००/- रु ची मागणी केली व सदर मागणीस विस्तार अधिकारी घाडगे यांनी संमती देवुन तडजोडी अंती त्यांचे करीता ५००/- रु कमी देण्यास सांगुन उर्वरीत रक्कम ग्रामसेवक फासे यांचेकडे देण्यास सांगितली.<br>त्याअनुषंगाने ग्रामसेवक फासे यांनी तक्रारदार यांचेकडुन २५००/-रु लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन आरोपी क्र.०२ घाडगे विस्तार अधिकारी यांना पंचायत समिती कार्यालय येथुन तात्काळ ताब्यात घेण्यात आले आहे. तरी वरील आरोपिंविरुध्द गुन्हा दाखल करण्यात येत आहे. |
| **मार्गदर्शन अधिकारी** | श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाप्रवि, पुणे<br>श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे |
| **पर्यवेक्षण अधिकारी** | श्री. संजीव पाटील, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, सोलापूर |
| **सापळा पथक** | श्री. उमाकांत महाडीक, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, सोलापूर<br>पोलीस अंमलदार- मपोना स्वामी पोना घाडगे, पोशि सण्णके चापोना उडाणशिव, सर्व ने. अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **टोल फ्री क्रमांक- १०६४ वर किंवा पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर येथे** संपर्क साधावा.

**संकेतस्थळ -** www.acbmaharashtra.gov.in
**ई मेल -** www.acbwebmail@mahapolice.gov.in
**ऑनलाईन तक्रार** – acbmaharashtra.net
**दुरध्वनी क्रमांक-** ०२१७-२३१२६६८
**व्हॉटस ॲप क्रमांक** – ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर
सत्यमेव जयते

**(उमाकांत महाडिक)**
**पोलीस निरीक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,सोलापूर**